# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १५०** **दिनांक ०९/०६/२०२१**

## गोध्रा, राज्य गुजरात येथुन घरफोडी गुन्हयातील मुख्य आरोपीत यास अटक करुन २५,४१,८६०/-रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दि. ०२/०४/२०२१ रोजी मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील आदि इन्टरप्रायझेस च्या भाडेतत्त्वावरील गाळा नंबर १९ गोडावुनमध्ये, बैलपाडा, तुंगारफाटा, मौजे सातीवली, वसई पुर्व येथे घरफोडी करुन अज्ञात आरोपीत यांनी एकुण ४८,०४,०००/- रुपये किंमतीचे ए.सी./एल.ई.डी. ची चोरी केलेबाबत वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५३/२०२१ कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आंतरराज्यीय टोळीचा मोरक्या आरोपी नामे अश्फाक अब्दुल जब्बा उर्फ कालीयाँ याचा गुप्त बातमीदारांमार्फत व तांत्रिक पुराव्याच्या आधारे वालीव गुन्हे प्रकटिकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी शोध घेतला असता आरोपीत नामे अश्फाक अब्दुल जब्बा उर्फ कालीयाँ, वय- ३० वर्षे, रा. ठि.हमीरपुर रोड, रहमत नगर, गोध्रा जि. पंचमहल, राज्य - गुजरात या ठिकाणी मिळुन आला असता त्यास ताब्यात घेण्यात आले.सदर आरोपीने त्याचे साथीदारांकरवी गोडावुन उचकटुन ए.सी./ एल.ई.डी.असे एकुण ४८,०४,०००/- रुपये किंमतीचा माल चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. सदर आरोपीकडुन गुन्हयात वापरलेले ट्रक व चोरीस गेलेला माल असा एकुण २५,४१,८६०/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.तसेच सदर आरोपीताचा १) वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. ७६२/२०२० कलम ४५७,३८० भा.द.वि. व २) मनोर पोलीस ठाणे गु.र.नं.१२३/२०२० कलम ३९४,३४ भा.द.वि.या गुन्हयामध्ये देखील सहभाग निष्पन झाला आहे.

सदरची कामगिरी श्री.संजयकुमार पाटील,पोलीस उपआयुक्त, परीमंडळ क्र.०२, श्री.अमोल मांडवे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोनि/ श्री.राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि./ज्ञानेश फडतरे, पो.हवा./मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.ना./सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पोशि/बालाजी गायकवाड, गजानन गरीबे यांनी केलेली आहे.

..........oooooooooooo...............